विषय जैन प्रकाश
सं. क्र. ३९
१९२८

REFBK-0003515

भा. इ. सं. म. पुरस्कृत ग्रंथमाला, क्रमांक १९

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
अ. नं.

# कऱ्हाड.

संपादक व प्रकाशक यशवंत राजाराम गुप्ते,
बी. ए., एम्. आर्. ए. एस्.,
माजी असि. सुप. फॉर एपिग्रफी.

सर्व हक्क संपादक व प्रकाशक यांनीं स्वाधीन ठेविले आहेत.

REFBK-0003515

१९२७

किंमत २ आणे.

[ हा लेख प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें आस्थापूर्वक अध्ययन करणारांस प्रेमपूर्वक अर्पण केला आहे.]

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिला
व
यशवंत राजाराम गुप्ते यांनीं कऱ्हाड, शुक्रवार पेठ, घ. नं. ५६
येथें प्रसिद्ध केला.

स(०)५९८७

# प्रास्ताविक चार शब्द.

" दक्षिण काशी " संबोधिल्या जाणाऱ्या या श्रीक्षेत्र कऱ्हाडास कांहीं दिवस आमचें वास्तव्य झाल्यामुळें, हें सातारा जिल्ह्यांतील अत्यंत प्राचीन शहर असल्यामुळें व येथें बौद्ध, मुसलमान आणि हिंदू इमारतींचे अवशेषही बरेच असल्यामुळें, येथील माहिती थोडक्यांत संग्रहित करावी अशी आम्हांस प्रबल इच्छा झाली होती. मे. एम्. वेब् साहेब, आय्. सी. एस्., कलेक्टर व डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार, सातारा यांचा मुक्काम येथें असतां यांनीं " आम्हीं पुढील खेपेस येथें येऊं तोंपर्यंत कऱ्हाडवर एक टिपण तयार करून ठेवावें " असें आम्हांस सांगितलें. आमचे मित्र पुराणवस्तु- संशोधन खात्याचे सुपरिंटेंडेन्ट रा. का. ना. दीक्षित, एम्. ए., यांनीं ते अगाशिवाचीं लेणीं तपासावयास आले तेव्हां " Karad and its Antiquities " वर कांहीं लिहा म्हणून आग्रह केला. भा. इ. सं. मं. च्या १४ व्या वार्षिक संमेलनासाठीं आमचेकडे निबंध मागण्यांत आला. तेव्हां आम्हीं कऱ्हाडची माहिती ( विशेषेंकरून ऐतिहासिकदृष्ट्या ) थोडक्यांत लिहून काढून ती या संस्थेकडे पाठविली. ती हिच्या श. १८४७ च्या त्रैमासिकांत प्रसिद्ध करण्यांत आली. तीच पुस्तकरूपानें अल्प किंमतींत कऱ्हाडकरांस, सातारकरांस व इतरांस मिळेल तर त्यांस अत्यंत सोईचें होऊन आणखी ऐतिहासिक सामुग्री जमविण्यास मोठी मदत होईल अशा सूचना आमच्या हिंदू व मुसलमान मित्रांनीं आम्हांस केल्या. भा. इ. सं. मं.चे चिटणीस प्रो. द. वा. पोतदार, बी. ए., यांस विचारितां प्रस्तुत लेख मंडळाच्या पुरस्कृत–ग्रंथमालेचा ११ वा क्रमांक म्हणून छापावा अशी त्यांनीं अपेक्षा केली. आम्हींही मंडळाचे सभासद आहोंत. तेव्हां आम्हांसही दुधांत साखर घातल्याप्रमाणें वाटलें. पुरस्कृत–ग्रंथ–मालेंत हा लहानसा लेख गोंवून मंडळानें आपला मार्मिकपणा व्यक्त केल्याबद्दल त्याचे आम्ही आभारी आहोंत.

वरील इच्छा व अपेक्षा यांचें मूर्तस्वरूप ह्या लेखाचें स्वतंत्र प्रकाशन होय. हा पुष्कळ वाढवून लिहितां आला असता. पण तसें करण्यानें ह्याचें मूल्य वाढलें असतें. आज विद्येची अभिरुचि असणाऱ्या बहुतेक लोकांची ऐपत बेताचीच असते. तथापि त्यांसच संग्रह करावासा वाटतो असा अनुभव आहे. ह्या आवृत्तीचे खपावरून पुढील अंदाज करितां येईल व लोकांस आवडल्यास कांहीं बाबींचें विस्तृत विवेचन पुढें करितां येईल. वास्तविक पाहतां उपलब्ध झालेली सर्व माहिती या लेखांत फार थोडक्यांत आणिलेली आहे. त्यांतील बरीच अगदीं नवीन आहे हें सांगावयास नकोच. या लेखाची छायाचित्रें, प्लॅन वगैरे घालून वाढविलेली इंग्रजी

३५१५

आवृत्ति फुरसदी अंती प्रकाशण्याचा विचार आहे. त्यास परमेश्वर मूर्तस्वरूप देईल तो सुदिन होय !

नासिक जिल्ह्यांतील ऐतिहासिक व पुराण-वस्तुसंशोधनाविषयींची आमची टिपणें मुंबई सरकारानें मे. सी. एम्. बेकर, आय्. सी. एस्., यांचे सूचनेवरून नासिक गॅझीटीअरचे दुरुस्तीच्या वेळीं त्यांत समाविष्ट करण्यासाठीं दप्तरीं दाखल केलीं आहेत. त्याप्रमाणेंच सातारा गॅझीटीअरचे दुरुस्तीस प्रस्तुत लेखाचा उपयोग होईल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

ह्या लेखाचें प्रकाशनास तावडतोब परवानगी देऊन मे. एफ्. जी. एच्. अंडरसन साहेब बहादुर, एम्. ए., आय्. सी. एस्., इं. ज. ऑ. रेजिस्ट्रेशन व मे. जे. पी. ब्रॅन्डर साहेब बहादूर, एम्. ए., आय्. सी. एस्., जे. पी., डि. र., सातारा, यांनीं आम्हांस उपकृत केलें यास्तव त्यांचे आम्हीं मनःपूर्वक आभार मानितों. हा लवकर छापून दिल्याबद्दल रा. अ. वि. पटवर्धन स्तुतीस पात्र आहेत.


कऱ्हाड, ता॥ १-४-१९२७ यशवंत राजाराम गुप्ते.

---


## पुरस्कार

श्री. यशवंतराव गुप्ते बी. ए., एम्. आर. ए. एस्, या संशोधकांनीं लिहिलेलें कऱ्हाडच्या माहितीचें हें छोटें पुस्तक भा. इ. सं. मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत गोंवण्याचा संधि रा. गुप्ते यांनीं आह्मांस दिली यास्तव आम्हीं मंडळातर्फें त्यांचे आभारी आहों. हें छोटें पुस्तक आश्रय मिळाल्यास पुढें वाढविण्याचा हेतु आहे. अशीं स्थलवर्णनात्मक पुस्तकें आपल्या इकडे थोडींच आहेत. नवीन लोकलबोर्ड म्युनिसिपालिट्या, देवस्थानपंच इत्यादींनीं असलीं पुस्तकें, प्रस्तुत लेखांत घातली आहे तशा प्रकारची विश्वसनीय माहिती अधिकारी लेखकांकडून देवबून, प्रसिद्ध करविणें. व त्यांस उदार आश्रय देणें हीं त्यांचीं महत्वाचीं कर्तव्यें होत. रा. गुप्ते यांचा हा प्रयत्न फार उपयुक्त आहे. अशा सर्व प्रयत्नांस मंडळाकडून शक्य तें उत्तेजन मिळेल.

माघवद्यी—१८४८ पुणें. दत्तो वामन पोतदार,
चिटणीस भा. इ. सं. मंडळ, पुणें.



१ आदिलशाहींतील कऱ्हाडचे मनोरे.



३५९५

# कऱ्हाड.*

लेखकः– यशवंत राजाराम गुप्ते. बी.ए., एम्. आर. ए. एस्, माजी
आसि. सुप. फॉर एपिग्रफी, कऱ्हाड.

सातारा जिल्ह्यांत ज्या ठिकाणीं सर्वांत प्राचीन अवशेष पुराव्यास दृत्त म्हणून उभे आहेत असें शहर कऱ्हाड होय. हल्लीं सातारा जिल्ह्याचें केंद्र तर हें आहेच. पुरातन काळीं हा जिल्हाच होता. या शहरास मोटारीमुळेंच एवढें महत्त्व आलें आहे असें नाहीं. कुंभारली घाटांतून कोंकणांत पाटणच्या बाजूनें उतरण्याचा रस्ता हाच होता. पुण्याचे बाजूस येथूनच जात. बेळगांवची वाट हीच. सांगण्याचा उद्देश हा कीं कऱ्हाडास कैक वर्षें स्वाभाविक महत्व आहे. आज काल आलेलें नाहीं.

कऱ्हाड हें नांव कसें पडलें हा एक मोठा वादग्रस्त मुद्दा आहे. भरूतचे लेखांत 'करह/कट' व कुडयाचे लेण्यांतील लेखांत (इ.स.पू. २००– इ.स.नं.१००) ‡"करहाकड" असें नांव आले आहे. तथापि मागचीं अक्षरें पुढें व पुढचीं मागें झाल्याचीं उदाहरणें आहेत. बनारस नांव वाराणसीचें अपभ्रष्ट रूप आहे हें निर्विवाद होय. म्हणजे 'न' व 'र' मागेंपुढें झाले. तेव्हां करहाकडचें करहाडक होणें स्वाभाविकच होय. 'र' चा 'ड' व 'ड' चा 'ट' तर नेहमींच होतो. प्राचीन लेखांत 'ट' व 'ड' जवळ जवळ सारखाच काढीत. शिवाय 'करहाटक' व 'करहाड' आणि करहाट' अशीं या गांवाचीं रूपें ताम्रपटांत, शिलालेखांत व महाभारतांत आलेलीं आहेत हें विश्रुतच आहे. 'कट' अथवा प्राकृत 'कड' याचा अर्थ कड अथवा कांठ असा होतो. करहाकट, करहाकड म्हणजे 'करहेचा कांठ' किंवा 'करहेच्या कांठचा गांव'. आतां ही नदी कोणची एवढाच प्रश्न

---

* कऱ्हाडावरील लेख भा. इ. सं. मं च्या १४व्या वार्षिक संमेलनांत वाचण्यांत आला. त्यानंतर जी माहिती उपलब्ध झाली ती त्यांत समाविष्ट केली आहे. आणखी किमिया वगैरे वरील प्राचीन ग्रंथांतून उल्लेख सांपडतच आहेत. त्यांविषयीं मुंबई व मद्रास येथील ग्रंथ-संग्रहालयांतून चौकशी चालू आहे. नीट संगति लागली म्हणजे पुढें प्रसिद्ध व्हावयाच्या इंग्रजी चोपड्यांत हे सर्व उल्लेख देतां येतील. य. रा. गुप्ते.

‡ मुंबई गॅझीटीअर सातारा, पृ. ४८०. Dynasties of the Kanaraese Districts of the Bombay Presidency, वर दोन्हीं ठिकाणचे लेखांत 'करहाकड' असल्याचें लिहिलें आहे. पण कुडयाचे लेखांत 'करहाकड' असून भरूतचे लेखांत 'करह/कट' आहे.

राहतो. ' कऱ्हा ' तर येथें नाहीं. नाहींतर कऱ्हाटक होणें साहजिक होतें. पुणें जिल्ह्यांत ' कऱ्हा ' आहे. पण सातारा जिल्ह्यांतील पाटण तालुक्यांत ' केरा ' आहे. तिचें मूळचें नांव नक्की काय होतें तें कळण्यास मार्ग नाहीं. ती पाटण नजीक कोयनेस मिळते. संगमापुढें पाटणापासून पुढें " कोयना " असेंच नांव प्रचलित आहे. कऱ्हाडास कृष्णेपेक्षां कोयनेचेंच पात्र मोठें आहे. खोडशीचें धरणामुळें तर कृष्णेचें पात्र अधिकच आकुंचित झालें आहे. तरीही कऱ्हाडचे पुढें नदीस 'कृष्णा' म्हणतात. यावरून पुरातन काळीं कोयनेस व कृष्णेस 'केरा'च संबोधित असल्यास नवल नाहीं. केरेचें प्राचीन नांव ' करहा ' अथवा 'कऱ्हा' ही कदाचित् असेल. करहा हें त्यावेळचें प्राकृत रूप असेल. नाहींतर नदीचें नांव याचें जवळ जवळ उच्चाराचें असेल. एकूण सांगावयाचें इतकेंच कीं केरा, करहा, कऱ्हा, यांचा कट अथवा कड यावरून या शहराचें कऱ्हाड नांव रूढ होणें संभवनीय आहे. दुसरी एक व्युत्पत्ति शक्य आहे ती अशीः— हट=प्रकाशणें. हाटक=सोनें. हट=बाजार. हटचें प्राकृत रूप अर्थात् हाट होईल. केरेच्या, करहेच्या, कऱ्हेच्या ठिकाणचें सोनें, सोन्यासारखें गांव किंवा बाजारचें गांव कऱ्हाड. आसमतांतील प्रदेशाच्या मध्यावर असल्यामुळें बाजाराचें मुख्य ठिकाण हेंच असलें पाहिजे. ' करहाकटक ' याची व्युत्पत्ति करहेच्या कांठचें सैन्य उतरण्याचें हें स्थान अशी दाखवितां येईल. परंतु हाटकेश्वर वगैरे स्थानें कऱ्हाडास असल्यामुळें ही फारशी संभवनीय वाटत नाहीं.

कऱ्हाडचे आसपासचे सर्वांत प्राचीन अवशेष म्हटले म्हणजे ज्यांस अगाशिवाचीं व जखीणवाडीचीं लेणीं म्हणतात ते होत. तीं हीनयान पंथाचीं आहेत. या पंथांत बुद्धाची प्रत्यक्ष मूर्ति पूजित नसत. पुढें पांचव्या साहाव्या शतकापासून महायान पंथास महत्व येऊन बुद्धाच्या मूर्ति विपुल कोरून त्यांची पूजा करूं लागले. प्रस्तुत लेणीं हीनयान पंथाच्या पूर्वकालांतील आहेत. मुंबई गॅझीटीयर सातारा पृ. ४७७ वर हीं इ. स. नंतरच्या पहिल्या दुसऱ्या शतकांतील होत असें प्रतिपादिलें आहे. गॅझीटीअरें लिहिलीं तेव्हां प्राचीन अवेशषांचा आजच्या एवढ्या सूक्ष्म रीतीनें अभ्यास करण्याचीं साधनें उपलब्ध नव्हतीं. हल्लीं तो मनु पालटला आहे. लेण्यांतील एक दोन मूर्ती व एक लेख नीट तपासल्यास याचा काल निश्चित करण्यास बराच वाव मिळतो. हा लेख असाः—"गोपालपुतस संघमितस लेण देयधम " म्हणजे गोपालाचा पुत्र संघमित्र याची देणगी हें लेणें होय. [ आर्कि. सर्व्हे. वेस्ट. इं. व्हा. ४ पृ.* ७. ]

---

* गॅझीटीअरकारांचे मतें वरील लेख इ. स. नंतरच्या पहिल्या शतकांतील आहे. फरग्युसन साहेबांनीं तो इ. स. पूर्वीचा आहे असें विधान केलें आहे. ( केव्ह टेम्पल्स पृ. २१३–२१७. ) आमचें मत वरीलप्रमाणें आहे. त्यास पुराण-वस्तु-संशोधन खात्यापैकीं कांहीं अम्मलदारांचा दुजोरा आहे.

3494

लिपीवरून हीं इ. स. पूर्वी १००।२०० वर्षे तरी कोरलीं असावींतसें दिसतें. निजावयाच्या दगडी बाकांवरून, चैत्याच्या आकारावरून, खांबावरून वगैरे हीं याच कालांतील असावीतसें वाटतें. त्यांत एक दोनच मूर्ती आहेत त्यांवरून व विशेषतः त्यांच्या पोषाखावरून या विधानास पुष्टि येते.

क्षत्रपांचीं नाणीं कऱ्हाडचे जवळच्या एका गावांत ' नदीस पूर ' येऊन गेल्यावर नेहमीं सांपडत असत असें JBBRAS वरून दिसतें. त्यांतील उताराच देतों:–

" During the last twelve or eighteen months coins have from time to time, been sent to me from the site of an old village on the banks of Krishna near Karad, in the Satara Collectorate, and an examination of these confirms the inference drawn, from the Kutch deposit. The circumstances under which they are found make them as valuable for the purposes of this inquiry as those composing a hoard. They are discovered singly as the soil is washed away by the rains and the neighbouring stream, and in such quantities as to show that they must have formed the currency of the place, and been plentifully in circulation."

Extract from page 16 of No. XXII.

पण हल्लीं असलीं नाणीं येथें सराफांचेकडे वगैरे पाहाण्यास मिळत नाहींत. क्वचित् कृष्णराई होन मात्र दृष्टीस पडतात.

महाभारताच्या सभापर्वाच्या ३२ व्या अध्यायांत सहदेवाच्या दक्षिणदिग्विजयांत कऱ्हाडचा उल्लेख असा आला आहे:–

नगरीं संजयन्तीं च पाषण्डं करहाटकम् ॥
दूतैरेव वशे चक्रे करं चैनानदापयत् ॥ ७२ ॥

यांत करहाटकास पाषंडी हें विशेषण लाविलेलें आहे. "ष" व "ख" सारखाच काढीत. देल्हीचे बाजूस अद्यापही काढितात. वरील विशेषणावरून कऱ्हाडास पाखण्डवादी लोक होते हें सिद्ध होतें. हे बहुधा बौद्ध लोक असावेत. हल्लींचें महाभारत इ. स. च्या पहिल्या दुसऱ्या शतकांत पुरें झालेलें गृहीत धरिलें तरी हें विधान सयुक्तिक दिसतें; कारण या वेळचे बौद्धधर्मीयांचे अवशेष अगाशिवाचे लेण्यांतून आहेत. कांहीं पूर्वीचे आहेत. कांहीं नंतरचे आहेत. जैन धर्माचे एवढे प्राचीन अवशेष कऱ्हाडचे आसपास नाहींत. या बाजूस जैन धर्माचा प्रसार फार पुढें झाला.

कऱ्हाड येथें सांपडलेल्या व कै. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं एपिग्रॉफिआ इंडिका या त्रैमासिकांत संपादिलेल्या राष्ट्रकूट घराण्यांतील तिसऱ्या कृष्णराजाच्या एका ताम्रपटांत कऱ्हाडचें नांव "करहाट" असें दिलें आहे. त्या ले-

खांत हा विषय ह्मणजे जिल्हा असल्याचें नमूद केलें आहे. करहाटाच्या ईशानाशिवाचा विद्यार्थी गगनाशिव यास वर निर्दिष्ट केलेलें दानपत्र दिलेलें आहे. ही देणगी येथें राहून तपश्चरण करणाऱ्या लोकांसाठीं दिलेली आहे. ती दिल्याची तिथि गतशके ८८० कालयुक्त संवत्सरे फाल्गुन व॥ १३ बुधवार ह्मणजे इ. स. ९५९ मार्च ९ ही होय.(ए.इ. व्हा ४पृ.२७८-९.) भा.इ. सं. मं. च्या संग्रहीं असलेल्या एका ताम्रपटांत देणगी दिलेल्या व्यासभट्ट नांवाच्या एका ब्राह्मणाच्या राहण्याच्या ठिकाणाचें नांव "करहाड"* असें नमूद केलें आहे. हें ठिकाण बहुधा कऱ्हाडच असावें. हा समज खरा असल्यास शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणांचें वास्तव्य येथें असे हें उघड दिसतें. हें दानपत्र शके ७३२ वैशाख शुद्ध पौर्णिमेचे म्हणजे इ. स. ८१० एप्रिल २३ चें आहे.

इ. स. च्या अकराव्या व बाराव्या शतकांत कऱ्हाड, कोल्हापुर व वाळवें या प्रांतांवर शिलाहारांच्या एका शाखेचा अंमल होता. त्यांची कुलदेवता कोल्हापूरची महालक्ष्मी होती. शके ९८० च्या मारसिंह राजाच्या ताम्रपटांत कऱ्हाडचें नांव " करहाट " असें आलें आहे. त्याच्या ताब्यांतील प्रांतांपैकीं हा एक होता. वरील मारसिंह आपणास फक्त महामंडलेश्वर म्हणवी. रा. ब. वैद्यांचें मतें शिलाहारांची राजधानी कऱ्हाड होती.+ तथापि डॉ. फ्लीट म्हणतात कीं "कऱ्हाड"त्यांची राजधानी असल्याचा उल्लेख कोठेंही नाहीं.‡ पुढें हा मुलूख यादवांचे राज्यांत सामील झाला.

करहाड प्रांतांत ४००० शहरें व गांवें ( मिळून ) मोडत असत म्हणून यास करहाट ४००० संबोधित असत. ( इं. अॅ. व्हॉ. ३० व ए. इं, व्हॉ. ३. ) खुद्द कऱ्हाडास प्राचीन मूर्ती, दगडी देवळांचे उंबरे व खांब, जुनीं लिंगें, नक्षीचे दगड वगैरे इतस्ततः पहावयास मिळतात. येथील हाटकेश्वराचे देवळाचे गटारावरील एक दगड आम्हीं आणिला आहे. त्यावर अल्प नक्षीचें काम आहे. त्यावरून अंदाज केल्यास ही नक्षी इ. स. ७०० ते ९०० च्या दर्म्यानची असावी. दगडावरील मूर्ति जैनांच्या असाव्यात. पण त्या अस्पष्ट असल्यामुळें त्यांबद्दल निश्चित मत देतां येत नाहीं. भा. इ. सं. मं. नें येथून एक जैनाची प्रतिमा असलेला मोठा दगड पुण्यास नेला असें सांगतात. पण एकंदरींत जैन अवशेष फारच थोडे नजरेस पडतात. रा. ग. अं. जोशी यांनीं खरेदी घेतलेल्या घरांतून उत्तर गुप्तकालीन

---

* Journal of Indian History, Vol. IV, Part II, September 1925, pp. 100–102 यावर आम्हीं प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रकूट घराण्यांतील तिसऱ्या गोविंदाच्या ताम्रपटाचा सारांश.

\+ मध्ययुगीनभारत भाग ३ पृ. ४३६.

‡ Dynasties of the Kanerese Districts of the Bombay Presidency, p. 101.

धर्तीच्या नक्षीचे दोन दगड आम्हीं हस्तगत केले आहेत. ते सातव्या शतकांतील दिसतात. मंगळवारांतील वेशीजवळ एका कोळ्याचे घराचे मागील बाजूस देवळाचे द्वाराचा एक दगड आहे. त्यावर एका बाजूस शंकरपार्वती नंदीवर बसल्याचा देखावा असून दुसऱ्या बाजूस तीं सिंहावर आरूढ झाल्याचें दाखविलें आहे. नवव्या ते बाराव्या शतकांतील ब्रह्मदेवाच्या व त्रिमूर्तींच्या प्रतिमा उपलब्ध झाल्या आहेत. फोटो घेण्याचा खर्च झेंपत असतां तर त्यां सर्वांचीं मुद्दाम छायाचित्रें घेऊन छापिलीं असतीं. कांहींचीं सोबत देत आहेंत. कोटांत पाणदरवाजाजवळ खंडित मूर्तींचा एक दगड एका पायास लागला होता. तो इ. स. १२ व्या १३ व्या शतकांतील असून औंधास पाठविण्यांत आला आहे. कांहीं वर्षांमागें रा. गिजऱ्यांस कार्तिकेयाची सुंदर मूर्ति कोरलेला एक महिरापीचा काळा दगड सांपडला होता. तो आम्हीं त्यांचे विचारानें गुदस्तां भा. इ. सं. मं. स अर्पण केला. मसांजदीजवळील दोन मनोऱ्यांचे मधील जागीं १२ व्या १३ व्या शतकांतीलच एक खांब लागला आहे. श्रीकृष्णाबाईचे समोरील काशीविश्वेश्वराचें द्वार याच सुमाराचे दोन उभे खांब व एक आडवा खांब यांचें बनविलेलें आहे. बालाजीच्या देवळासमोर जमविलेल्या प्रतिमांत एक खंडित व झिजलेली नागाची मूर्ति आहे. कऱ्हाडास ठिकठिकाणीं युद्धांत पडलेल्या लोकांचे दगड तर शेंदोनशें आहेत. त्यांपैकीं कांहीं सुबक आहेत. इद्ग्याजवळ लक्ष्मीदेवीचें एक भव्य मंदिर होतें. तें इतकें उंच होतें कीं त्याची छाया नदीकांठपर्यंत पडे. तें मोडून इद्गा व कबरस्थानाचा कांहीं भाग असे बांधण्यांत आले. अद्यापि इद्ग्याचे भिंतींत दोन तीन मूर्ती खोदलेले दगड डोकावीत आहेत. कांहीं खोदीव दगड उलटे लाविलेले आहेत. त्यांत एकादा लेख गडप झाला असल्यास नकळे ! मंगळवाराचे पलीकडे लंगर मसजिदीचे आसपास शेतांतून मडकीं विटा वगैरेचे भरपूर अवशेष आहेत. त्या बाजूसच जुनें कऱ्हाड होतें असें म्हणतात. तेथें क्वचित् नाणींही पूर्वीं उपलब्ध झाल्याचें ऐकिवांत आहे. तथापि भूमिगत द्रव्याचा कायदा पसार होण्यापूर्वींच्या मिळालेल्या त्या नाण्यांचें संशोधन चांगलें झालें नसल्यामुळें व त्या बाजूस खुदाई झालेली नसल्यामुळें साधार विधानें करितां येत नाहींत. तरी एके दिवशीं सायंकाळीं आम्हीं जे अवशेष तपासले त्यांवरून इ. स. १३००।१४०० चे पर्यंतचे ते असावेतसें वाटलें.

कऱ्हाडे ब्राह्मणांस नांव याच गांवावरून पडलेलें उघड दिसतें. १२ व्या ते १४ व्या शतकांत हे बहुधा कोंकणांत उतरले असावेत. कदाचित् कोंकणांतील लोक हे मूळचे तेथील रहिवाशी नसल्यामुळें व हे इकडून गेल्यामुळें यांस "कऱ्हाडे" संबोधूं लागले असतील. तथापि या मुद्यावर अद्याप चांगलासा प्रकाश पाडण्यासारखा पुरावा उपलब्ध न झाल्यामुळें या बाबतींत अधिक न लिहिणें बरें.

श्रीक्षेत्र काशीप्रमाणें यात्रेकरूंस कऱ्हाडास पंचक्रोशी करावी लागे. पांच कोसांत दैवतें होतीं. कऱ्हाडास दक्षिण काशीच म्हणत. एका मंगलाष्टकांत विश्वेश म्हणजे हल्लींच्या समजाप्रमाणें श्रीकृष्णाबाईचे समोरील काशीविश्वेश्वर व कमलेश्वर म्हणजे हल्लींचे समजुतीप्रमाणें कर्डेपिराजवळील महादेव यांस उल्लेखितात. यांतच कऱ्हाडास आदिक्षेत्र गणिलें आहे. दुसऱ्या एका मंगलाष्टकांत हाटकेश्वराचें नांव आहे. वरील तिन्हीं देवळें प्राचीन नाहींत. परंतु कदाचित् काशीविश्वेश्वर व कमलेश्वर यांचीं मंदिरें पुरातन देवळांचेच जागांवर बांधिलीं असल्यास न कळे ! हल्लींचें हाटकेश्वराचें देऊळ तर नवेंच असून पुरातन हाटकेश्वराचे जागींही नाहीं. प्राचीन मंदिर नदीचे कांठीं होतें म्हणतात.

'कऱ्हाडमाहात्म्या'च्या संस्कृत हस्तलिखित प्रती क्वचित् उपलब्ध होण्यासारख्या असून त्यांत संगमापासून फरशीपर्यंतच्या तीर्थांचा उल्लेख आहेसें ऐकितों. पण हें माहात्म्य केव्हां लिहिलें वगैरे माहिती प्रकाशण्यास प्रत्यक्ष त्याची प्रत हातीं आल्यावांचून मार्ग नाहीं.मराठींतही कऱ्हाड " माहात्म्य " लिहिलेलें आहे. आम्हांस मिळालेल्या हस्तलिखित प्रतींत २१ आध्याय आहेत. १ गरुड २ हाटकेश्वर ३ भैरव ४ गणेश ५ नाग ६ कमलेश्वर ७ नृसिंह व ८ मार्कंडेय हीं कऱ्हाडचीं अष्ट तीर्थें होत.

'कसबे कऱ्हाड ये स्थलींच्या ब्राम्हणांस पूर्वीं आदलशहाचे कारकीर्दीस कित्येक वृत्ती होत्या* ' असा आम्हीं वि. ज्ञा. वि. त छापिलेल्या एका सनदेंत उल्लेख आहे. त्या वृत्ती काढून थोरल्या शिवछत्रपतींनीं ब्राह्मण पाहोन त्यास धर्मादायाच्या मोईनी करून दिल्या. राजारामाचे कारकीर्दींत पुनः शिवापूर ( सैदापूर ) हा गांव कऱ्हाडचे ब्राह्मणांस अग्रहार करून देण्यांत आला.

शके १६२२ विक्रम नाम संवत्सरे पर्यंत कऱ्हाडास बरेंच धार्मिक महत्व असून दक्षिण काशीचें तें 'शक्तिक्षेत्र, मुक्तिक्षेत्र, सुवर्णकर क्षेत्र ' समजलें जाई असें त्या वर्षीच्या भाद्रपद व॥ त्रयोदशी शुक्रवारीं† दिलेल्या एका सनदेवरून सिद्ध होतें. हींत संगमास कृष्णा–ककुद्मती–प्रीतिसंगम म्हटलें आहे. आम्हीं विविध-ज्ञान–विस्तार, १९२४, पृष्टें २८९–२९२ वर छापिलेल्या व रा. गिजऱ्यांस दिलेल्या सनदेंतही नद्यांचीं नांवें कृष्णाककुद्मती अशींच आहेत. कृष्णा हें नांव तर कायमच आहे. पण वरील दोन सनदांवरून कोयनेस ' ककुद्मती ' संबोधीत हें विशद होतें. कोयनेस ककुद्मती कधींपासून म्हणूं लागले हें कळत नाहीं. या सनदेंत कऱ्हाडचा उल्लेख ' कऱ्हाटक ' असा आला आहे.

---

* विविध –ज्ञान–विस्तार, जून, १९२४, पृ २८९.

† तारीख ३० ऑगस्ट इ. स. १७००.

कमलेश्वराचे पलीकडे संत सखूबाईचें देऊळ आहे. ही गिजरे घराण्यांतील होती असें म्हणतात. कांहीं सांगतात कीं ती लाटकर कुलांतील होती.

हिच्या देवळाच्या खालचे बाजूस एक शंकराचें देवालय आहे. तें गोसावी अनगळ यानें शके १६६६ त बांधिलेलें दिसतें; कारण त्यापुढील चबुथऱ्यांतील एका दगडावर " शके १६६६ रक्ताक्षी संवत्सरे गोसावी अनगळ " असा लेख आहे. अर्थात् हा लेख इ. स. १७४४ तील आहे.

मुसलमानी अमदानींत कऱ्हाडास " कलहराबाद " म्हणत.

विजापूरच्या बादशाहाचा नायब सुभा येथें रहात असे. विजापूरचे राज्यांतील व कांहीं इतर ठिकाणचे मक्केस जाणारे यात्रेकरू येथें जमून पुढें कोंकणांत उतरून दाभोळ वगैरे ठिकाणीं बोटींत बसत. कऱ्हाडचे पश्चिमेचे दरवाज्यास 'दाभोळ' दरवाजा म्हणत व म्हणतात.

विजापूरचे सैन्याचा तळ कऱ्हाडचे आसपास १॥-२ मैलांवर पडे. तेथें अद्याप १२-१४ पडकीं तळीं आहेत. त्यांत पूर्वी विपुल पाणी असून कमळें वगैरे असत असें सांगतात.

आतां मुसलमानी अवशेषांकडे वळूं. किल्ल्यांत पश्चिमेस एक मोठी थोरली *बावली असून तिची खोली नदीचे पाण्याइतकी आहे. नदीचें पाणी हींत मोठ्या नळ्यानें सोडिलें आहे. शत्रूंनीं किल्ला हस्तगत केला तरी हींत सैन्यास दडून बसतां यावें एवढ्यासाठीं ही बांधिली असें म्हणतात. पण गॅझीटीअर-कारांचें मतें सामुग्री सांठविण्यासाठीं हिचा उपयोग करीत असावेत. ही विजापूरचे बादशहाचे अगोदरची आहे म्हणतात. लक्ष्मीचें जुनें देऊळ मोडून इद्गा उभारण्यांत आला हें वर आलेंच आहे. तो तीस फूट उंच व २५० फूट लांब आहे. त्याचे देवळींत एक शिला बसविलेली आहे. तीवरील लेखांत हिजरी सन ९८० दिलेला असून त्यांत मुसलमानांचीं प्रेतें पुरण्यास व ( इद्ग्याचे ) दुरुस्तीस अल्ली आदिलशहाचे कारकीर्दींत एक चाहूर जमीन दिल्याचा उल्लेख आहे.

पहिल्या अल्ली आदीलशहाचेच वेळची म्हणजे इ. स. १५५७–१५८० चे दर्म्यान इब्राहीमखानानें‡ बांधलेली येथें मसजिद् असून तिचे बाजूस १०६ फूट उंचीचे दोन भव्य मनोरे आहेत. शिवछत्रपतींनीं अफझुलखानास प्रतापगडावर मारिल्यावर त्याचा पुत्र फाजलखान खंडूजी खोपड्याचे मदतीनें पळून विजापुरास जाण्यासाठीं आला, तो कांहीं दिवस या मनोऱ्यांपैकीं एकांत होता.

गुरुवारांत दोन दर्गे आहेत. ते दोन मुसलमान पीरांचे असून हिजरी सन

---

* पायऱ्या असलेली विहीर.

‡ मुंबई गॅझीटिअर, सातारा, पृ. ४७५.

३५७५ (८)

७५२ व ७९३ यांत बांधिलेले आहेत.+ दोहोंत एक उंच आहे, त्याचा वरचा भाग सुप्रसिद्ध चांदबिबीनें त्यांतील मौलाली पावला एतदर्थ त्याचे स्मरणार्थ बांधिला. कमी उंच असलेला दर्गा मौलालीची बायको बी फातिमा हिचा आहे. दोन्ही दर्ग्यास बादशाही इनाम चालू आहे. शनिवारांत ख्वाजा खिजर यांचा दर्गा आहे. त्याचे दिवाबत्तीसाठीं मुजावरांस अदिलशाही अंमलदारांनीं दिलेले हुकूम आजही अस्तित्वांत आहेत. कचेरीचे जवळ काळा चबुतरा आहे. तेथें आदिलशाहींत न्याय होत असे. खालील बाजूस कळंबाचें झाड आहे. त्या ठिकाणीं देहांतशासन होत असे.

कऱ्हाड प्रांतांतील २२ गांवची देशमुखी शहाजीस आदिलशहानें रणदुल्लाखानाचे हाताखालीं इ. स. १६३८–३९ तील मोहिमेंत उत्तम काम केल्याबद्दल जहागीर दिली. *इ. स. १६५३ त ही देशमुखी बाजी घोरपड्यास बहाल करण्यांत आली. इ. स. १६६१ च्या जान्युआरींत अली आदिलशाहा, ( दुसरा ), स्वतः फौज घेऊन शिवाजीचे सैन्याशीं लढण्यास आला. विजापूरचे सैन्याचा व मोरोपंत पिंगळ्याच्या लष्कराचा सामना कऱ्हाडास झाला.

इ. स. १७१७ त मोगलांचा अम्मलदार पडदुल्लाखान कऱ्हाडास रहात असेः त्यास शाहू छत्रपतींनीं बाळाजी विश्वनाथास घेऊन घालवून दिलें व गांव काबीज केला. त्यांचे कारकीर्दींत हा मुलुख पंत प्रतिनिधींच्या ताब्यांत होता. कचेरी कोटांत असे. ( दौलतराव ) शिंदे व दुसरे बाजीराव पेशवे यांनीं इ. स. १८०५ चे सुमारास परशुराम श्रीनिवास प्रतिनिधि यांस ते पुण्यास असतां पकडण्याचा बेत केला। तेव्हां त्यांस चुकवून प्रतिनिधि पुण्याहून कऱ्हाडास पळून आले. दुसरे बाजीराव साहेब इ. स. १८१८ त पळत असतां §ता. २३ जान्युआरीस येथें मुक्कामास होते. ब्रिटिश सरकारचें राज्य झालें तेव्हांही कऱ्हाड व आसपासचा भाग पंतप्रतिनिधींचे ताब्यांत असून तालुक्याचें ठाणें कोटांत असे. इ. स. १८५२ सालीं कऱ्हाडचा मोबदला होऊन हें इंग्रज सरकारचे राज्यांत सामील झालें. हल्लीं हें सातारा जिल्ह्याच्या कऱ्हाड तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. इ. स. १८८९ पर्यंत पंतांची कचेरी कोटांत होती. ती त्या सालीं कुंडलास गेली.


२२०० वर्षें अनेक राज्यांचा, राज्य–क्रांत्यांचा, धार्मिक उलाढालींचा व कारागिऱ्यांचा इतिहास पटविणाऱ्या कऱ्हाडची ही अशी थोडक्यांत हकीकत आहे.

---

+ मुंबई गॅझीटिअर, सातारा, पृ. ४७६ व दर्ग्यांचे वहिवाटदार मुतवल्ली यांनीं दिलेली माहिती.

* मराठी रियासत, पू. वि. , पृ. १५७.

§ मुंबई गॅझीटीअर, सातारा, पृ. ४८०.



४ ब्रह्मदेव व त्रिमूर्ति.

REFBK-0003515

REFBK-0003515

# भारत—इतिहास—संशोधक—मंडळ—ग्रंथमाला.

वि. सू.—मंडळाचे बहुतेक ग्रंथांस मुंबई व बडोदें सरकारांचा आश्रय आहे. * अशी खूण केलेले ग्रंथ मुंबई सरकारनें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयांसाठीं मंजूर केले आहेत.

| मालांक. | किंमत रु. |
|---|---|
| *१ अहवाल ( शके १८३२ ) | ३ |
| २ ,, ( शके १८३३ ) | ५ |
| ३ सुचंतविचार(रा.वि.का.राजवाडे) | २ |
| ४ वार्षिक इतिवृत्त (शके १८३४) | ५ |
| ५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (रा. राजवाडे ) | १८८ |
| *६प्रथमसंमेलनवृत्त(शके १८३५) | ८१२ |
| *७वार्षिक इतिवृत्त (शके१८३५) | ६ |
| *८द्वितीयसंमेलनवृत्त शके१८३६) | ३ |
| *९वार्षिक इतिवृत्त (शके १८३६) | ३ |
| *१०मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) | ३ |
| *११वार्षिक इतिवृत्त (शके १८३७) | ६ |
| भा. इ. सं. मं. त्रैमासिकः—१८४२ १८४३।४४।४५।४६ प्रत्येकीं रु. | ३ |
| *१२तृतीयसंमेलनवृत्त(शके१८३७) | ३ |
| *१३मुकुंद महाभाष्य (संस्कृत) | ८८ |
| *१४ ग्रंथराज ( दासोपंत ) ,, | ८८ |

| मालांक | किंमत रु. |
|---|---|
| * १५ स्फुट प्रकरणें भाग १ ला | ८१२ |
| * १६ स्फुट प्रकरणें भाग २ रा | ८१२ |
| * १७वार्षिक इतिवृत्त(शके १८३८) | ३ |
| १८ चतुर्थसंमेलनवृत्त(शके१८३८) | ४ |
| *१९राजवाडे-खंड-स्थलसूची(१८३८) | ४ |
| *२०पंचमसंमेलनवृत्त(शके१८३९) | ३ |
| +२१संशोधनसंग्रह (१८३ , छा. आहे | |
| २२चंद्रचूड-दप्तर-कला १ | १ |
| २३महाराष्ट्रसारस्वत ( संपलें. ) | |
| २४षष्ठसंमेलनवृत्त ( १८४० ) | |
| २५सप्तसंमेलनवृत्त ( १८४१ ) | |
| २६संशोधकाची छोटी जंत्री. ( रा. द. वि. आपटे ) | |
| २७ प्रदर्शनपरिचय | |
| २८फारसी पत्रव्यवहार मूळ व भाषांतर ( कंपनी व पेशवे ) | रु. ५ |
| २९ फार्शी मराठी कोश | रु. १ |
| ३० शिवचरित्र साहित्य | १८८ |

## मंडळाकडे मिळणारीं इतर पुस्तकें.

**वासुदेव शास्त्री खरे-कृत** :- (१) अधिकार योग (२) हरिवंशाचा बखर किं. प्रत्येकीं ८१० **ऐ. ले. संग्रह राजवाडेकृतः**- मराठयांच्या इतिहासाचीं साधनें खंड १-५-७-१० ११ किं. अनुक्रमें रु. २५, ५, ३, २॥, ८६, **चांदोरकरकृतः**- संतकविकाव्यसूचिः- किं. रु. २. **काव्येतिहाससंग्रह** व **भारतवर्षः**- मासिकाचे काहीं अंक व प्रकरणें. **चित्रेंः**- थोरले बाजीराव नऊरंगी किं. ८८; पिलाजी जाधवराव व श्री. शिवाजी महाराजांचा हाफ टोन किं. ८॥.

**टीपः**- टपालहंशील व बंगी व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. घाऊक घेणारांस चांगलें कमिशन देऊं. माहितीपत्रक मागवा.